॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Phone : (02462) 215525** **DEPARTMENT OF STUDENTS DEVELOPMENT** **Website: srtmun.ac.in**
**Fax : (02462) 215572** **E-mail: dir.dsd@srtmun.ac.in**

जा.क्र./वि.वि.वि/२०२४—२५/४८ दिनांक : ०९/०९/२०२४

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नित महाविद्यालये.
मा. संचालक, सर्व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर.
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, पेठ, लातूर.
मा. संचालक, विद्यापीठ उपपरिसर, परभणी.
मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
मा. समन्वयक कै. उत्तमराव राठोड आदीवासी विकास व संशोधन केंद्र किनवट.

**विषय : आंतरमहाविद्यालयीन ' ज्ञानतीर्थ ' युवक महोत्सवासाठी प्रवेशिका पाठविणे बाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२४—२५ चा आंतरमहाविद्यालयीन 'ज्ञानतीर्थ' युवक महोत्सव **हा** सहयोग सेवाभावी संस्थेचे कॉलेज ऑफ एज्युकेशन, विष्णुपूरी, नांदेड येथे **ऑक्टोबर च्या तीस—या आठवडयात** आयोजित करण्यात आला असून, युवक महोत्सवाची तारीख परिपत्रकाद्वारे लवकरच कळविण्यात येईल. सदर युवक महोत्सवात **प्रत्येक महाविद्यालयाने कमीत कमी तीन ते पाच कलाप्रकारामध्ये सहभाग नोंदविणे अनिवार्य आहे**. या युवक महोत्सवात पुढील कलाप्रकारांचे/स्पर्धांचे सादरीकरण होणार असून, सर्व महाविद्यालयांनी आपल्या **प्रवेशिका दि. २८ सप्टेंबर,२०२४** पर्यंत कार्यालयीन वेळेत विद्यार्थी विकास विभागात सादर कराव्यात. याची नोंद घ्यावी, ही विनंती.

**कलाप्रकार/स्पर्धा**

<u>अ) संगीत विभाग :</u>

१) शास्त्रीय गायन २) शास्त्रीय तालवाद्य ३) शास्त्रीय सूरवाद्य ४) सुगम गायन (भारतीय) ५) सुगम गायन (पाश्चात्त्य) ६)समूहगायन (भारतीय) ७) समूहगायन (पाश्चात्त्य) ८) कव्वाली

ब) नृत्य विभाग :

९) शास्त्रीय नृत्य १०) लोकनृत्य/आदिवासी नृत्य

क) नाटयविभाग :

११) एकांकिका (मराठी/हिंदी) १२) विडंबन (उपरोधिक अभिनय) १३) मूकअभिनय १४) नक्कल (मिमिक्री)

ड) वाङ्मयीन विभाग :

१५) वादविवाद (मराठी/हिंदी/इंग्रजी) १६) वक्तृत्व (मराठी/हिंदी/इंग्रजी) १७) कथाकथन

इ) ललित कला विभाग :

१८) चित्रकला (ऑन द स्पॉट पेंटिंग) १९) कोलाज २०) पोस्टर मेकिंग २१) मृद्‌मूर्तिकला २२) मेहेंदी २३) व्यंगचित्रकला (कार्टुनिंग) २४) रांगोळी २५) स्थळ छायाचित्रण (स्पॉट फोटोग्राफी) २६) कलात्मक जुळवणी (इन्स्टॉलेशन)

फ) महाराष्ट्राच्या लोककला विभाग :

२७) पोवाडा २८) लावणी २९) लोकसंगीत (फोक ऑर्केस्ट्रा) ३०) प्रबोधनात्मक जलसा (सत्यशोधकी/आंबेडकरी)

**१) प्रवेश शुल्क : १) प्रत्येक सांघिक स्पर्धेसाठी रु. ५०/—**

**२) प्रत्येक वैयक्तिक स्पर्धेसाठी रु. ३०/—**

२) महाविद्यालयाचा संघ पाठविताना जास्तीत जास्त **३०** विद्यार्थी/विद्यार्थिनींची निवड करावी. तसेच **प्रवेशिकेसोबत विद्यार्थ्याचे आधार कार्ड, बोनाफाईड सर्टिफिकेट, दहावीची सनद व टी.सी. ची झेरॉक्स प्रत जोडणे अनिवार्य आहे. अन्यथा प्रवेशिका स्वीकारली जाणार नाही, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.**

**३)** महाविद्यालयांनी आपल्या प्रवेशिका व प्रवेश शुल्काची रक्कम 'मा. वित्त व लेखाधिकारी, स्वा.रा.ती.म.विद्यापीठ,नांदेड' यांच्या नावे डी.डी. काढून किंवा रोख रक्कम भरुन खास दूतामार्फत **दिनांक २८ सप्टेंबर,२०२४** पर्यंत कार्यालयीन वेळेत विद्यार्थी विकास विभागात सादर करावी. त्यानंतर आलेल्या प्रवेशिका स्वीकारल्या जाणार नाहीत.

४) युवक महोत्सवामध्ये भाग घेणाऱ्या प्रत्येक स्पर्धकासोबत प्राचार्यांच्या सहीनिशी चालू शैक्षणिक वर्षाचे ओळखपत्र तसेच आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवासाठी **खास तयार केलेले ओळखपत्र असणे अनिवार्य आहे**. ओळखपत्राशिवाय कोणत्याच स्पर्धेत अथवा कार्यक्रमात भाग घेता येणार नाही, याची नोंद घ्यावी. संघव्यवस्थापक, संघव्यवस्थापिका, प्रशिक्षक, वादक, वादक साथीदार यांच्याकडेही प्राचार्यांच्या स्वाक्षरीचे युवक महोत्सवासाठी खास तयार केलेले ओळखपत्र असणे अनिवार्य आहे. कलाप्रकार सादर करण्याच्या पंधरा मिनिटे अगोदर संबंधित कलाप्रकारात सहभागी असलेल्या सर्व स्पर्धकांचे नोंदणी फॉर्म व ओळखपत्र त्या त्या मंचाच्या संयोजन समितीकडे जमा करणे अनिवार्य आहे.

५) सहभागी संघाचा प्रवासखर्च व जेवणाचा खर्च त्या—त्या महाविद्यालयांनी करावा.

६) परीक्षणाबाबत काही तक्रार असेल तर ती लेखी स्वरूपात संघव्यवस्थापकांनी आपल्या स्वाक्षरीनिशी संयोजन समितीच्या अध्यक्षांकडे द्यावी. कार्यक्रमस्थळी गैरवर्तन करु नये किंवा प्रसिध्दी माध्यमांकडे आपल्या भावना व्यक्त करु नयेत. असे कृत्य जर घडले किंवा कुठल्याही संघाकडून युवक महोत्सवाच्या काळात गैरवर्तणूक झाल्यास संबंधित महाविद्यालयावर ए.आय.यु. नवी दिल्ली, यांच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

७) प्राचार्य/संघव्यवस्थापकांनी आपल्या संघाकडून कोणतीही गैरशिस्त होणार नाही याची कटाक्षाने काळजी घ्यावी.

८) संघासोबत एक संघव्यवस्थापक व विद्यार्थीनी असतील तर एक संघव्यवस्थापिका पाठविणे अनिवार्य आहे.

९) ऐनवेळी कोणत्याही स्पर्धेसाठी प्रवेशिका स्वीकारली जाणार नाही व कोणताही बदल केला जाणार नाही.

**१०) आयोजक महाविद्यालयातून शोभायात्रा (रॅली) काढण्यात येणार आहे. तरी संघव्यवस्थापकांनी आपले संघ घेऊन युवक महोत्सवाच्या शोभायात्रेत सर्व महाविद्यालयांनी सहभागी व्हावे, अशी अपेक्षा आहे.**

११) आपल्या महाविद्यालयाच्या संघात सहभागी होणारे संघव्यवस्थापक, विद्यार्थी व विद्यार्थीनीची एक यादी पुर्वनियोजन करण्याच्या दृष्टीने आयोजक महाविद्यालयास पाठवावी व त्याची एक प्रत संचालक, विद्यार्थी विकास विभाग यांचेकडे पाठवून द्यावी.

१२) युवक महोत्सवातील कुठल्याही कला प्रकारासाठी धारदार शस्त्रांचा, काचेचा, अग्नीचा किंवा ज्वालाग्रही पदार्थांचा उपयोग करता येणार नाही. उपरोक्त वस्तूंचा वापर केल्यास संबंधित संघास त्या कला प्रकाराचे गुण मिळणार नाहीत. त्याचबरोबर त्या महाविद्यालयाचा इतर कला प्रकारातील सहभाग रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१३) सहभागी संघांना एकांकिका सादरीकरण करण्यासाठी वेळापत्रकामध्ये जी तारीख व जो वेळ देण्यात येईल त्याच तारखेला आणि वेळेला त्या संघाने आपली एकांकिका सादर करणे बंधनकारक राहील. जी महाविद्यालये एकांकिका या कला प्रकाराच्या सादरीकरणाची तारीख व वेळ पाळणार नाहीत त्यांना त्यानंतर कुठल्याही परिस्थितीत स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. याची नोंद घ्यावी.

१४) एकांकिका हिंदी भाषेत असेल तर प्रपत्रकामध्ये तसा स्पष्ट उल्लेख करावा.

१५) एकांकिका सादरीकरणासाठी संबंधित लेखकाच्या परवानगीचे प्रमाणपत्र अनिवार्य आहे.

१६) युवक महोत्सवामध्ये सहभागी संघव्यवस्थापकांनी आपापल्या संघासासोबत मुक्कामी राहणे अनिवार्य आहे. संघव्यवस्थापकांची वेगळी व्यवस्था केली जाणार नाही. तसेच सहभागी स्पर्धकांनी रात्री झोपण्याकरिता संतरजी व ब्लॅकेट सोबत आणावे.

१७) युवक महोत्सव आनंदी व उत्साहाच्या वातावरणात शांततेने संपन्न व्हावा याकरिता प्राचार्य, संघव्यवस्थापक, सहभागी स्पर्धक यांच्याकडून सहकार्याची अपेक्षा आहे.

**१८) प्रस्तुत युवक महोत्सवात सहभागी असणाऱ्या सर्व महाविद्यालयांनी युवक महोत्सवाचे वेळापत्रक काटेकोरपणे पाळणे आवश्यक आहे. प्रत्येक कलाप्रकाराच्या किंवा स्पर्धेच्या नियोजित वेळापत्रकाप्रमाणे त्या त्या महाविद्यालयाचा संघ मंचावर उपस्थित न राहिल्यास संबंधित संघास स्पर्धेतून बाद करून पुढील संघास सादरीकरणासाठी पाचारण केले जाईल.**

**स्पर्धेतून संघ बाद झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संघव्यवस्थापक किंवा संघव्यवस्थापिका यांची राहील. कोणत्याही सबबीवर बाद झालेल्या संघास पुन्हा सादरीकरणाची संधी दिली जाणार नाही.**

**१९) पुर्वपरवानगीशिवाय कोणालाही कार्यक्रमाच्या मंचावर येता येणार नाही व कोणत्याही प्रकारचे मनोगत व्यक्त करता येणार नाही. असे घडल्यास ए. आय. यु. नवी दिल्ली यांच्या नियमानुसार कारवाई करण्यात येईल.**

२०) प्रस्तुत युवक महोत्सवात स्पर्धांचे सादरीकरण भाग्यपत्रकाच्या (Lots) आधारे होणार आहे. सदरील भाग्यपत्रक सर्व सहभागी महाविद्यालयाच्या संघव्यवस्थापक/संघव्यवस्थापिका यांच्या बैठकीमध्ये सर्वासमक्ष प्रसिध्द केले जाईल. बैठकीची तारीख आपल्याला कळविली जाईल त्यादिवशी संघव्यवस्थापक/संघव्यवस्थापिका यांनी वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक आहे. नंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

२१) स्पर्धा सुरू होणाच्या किमान अर्धातास अगोदर संघव्यवस्थापक/संघव्यवस्थापिका यांनी आपल्या संघाचा रिपोर्टींग फार्म व स्पर्धकांचे ओळखपत्र संबंधित मंचाकडे सादर करणे बंधनकारक आहे.

२२) ०१ जुलै, २०२४ रोजी स्पर्धकाचे वय २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. तसे आढळल्यास स्पर्धकाला स्पर्धेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

२३) आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सावात सहभाग घेण्यासाठी स्पर्धक किमान पूर्णवेळ एक वर्षीय अभ्यासक्रमासाठी (Degree / Course / Diploma) प्रवेशित असणे आवश्यक आहे.

डॉ. सूर्यप्रकाश जाधव
संचालक,
विद्यार्थी विकास विभाग.

प्रत महितीस्तव :

सीस्टीम एक्सपर्ट, (संगणक विभाग) सदरील परिपत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर Circular Regarding InterCollegiate Youth Festival 'Dnyanteerth' या शिर्षकाखाली विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील Home Page मधील Administration आणि Students Development सदराअंतर्गत प्रसिध्द करावे

दिनांक :     /     /२०२४.

प्रति,
**मा. संचालक,**
विद्यार्थी विकास विभाग,
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,
नांदेड.

०१. महाविद्यालयाचे नाव : ——————————————————————————

०२. संघव्यस्थापकाचे नाव : ——————————————————————————

०३. संघव्यस्थापिकेचे नाव : ——————————————————————————

०४. प्रशिक्षक /वादक /साथीदारांचे नाव (कलाप्रकारासह)

१)

२)

३)

०५. स्पर्धेत भाग घेतलेल्या कलाप्रकारांची संख्या :

१) सांघिक स्पर्धांची नावे

२) वैयक्तिक स्पर्धांची नावे

०६ स्पर्धकांची संख्या :— मुले —————— मुली —————— एकूण ——————
०७ संघ व्यवस्थापक भ्रमणध्वनी क्रमांक :— ————————————————————
०८ संघ व्यवस्थापिका भ्रमणध्वनी क्रमांक :— ————————————————————
०९ युवक महोत्सव प्रवेशिका शुल्क पावती क्रं. ———————— दिनांक —————
१० विद्यार्थी विकास निधी शुल्क पावती क्रं. ————————— दिनांक —————
११ महाविद्यालयाचा इ-मेल ...............................................................

प्राचार्य

सांस्कृतिक विभागप्रमुख

सही व शिक्का

स्पर्धकाचे

छायाचित्र

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
## 'ज्ञानतीर्थ', विष्णुपूरी, नांदेड — ४३१ ६०६
## युवक महोत्सव सहभाग — स्पर्धक योग्यता प्रमाणपत्र

१. महाविद्यालयाचे नाव :————————————————

:————————————————

२. स्पर्धकाचे नाव :————————————————

३. कायमचा पत्ता :————————————————

:————————————————

४. लिंग :————————————————

भ्रमणध्वनी क्रमांक :————————————

५. जन्म दिनांक :————————————————

६. ०१ जुलै, २०२४ रोजीचे स्पर्धकाचे वय :———वर्ष ———महिने———दिवस

७. रक्त गट :————————————————

८. भाग घेतलेल्या स्पर्धेचे नाव १. :——————————
२. :——————————
३. :——————————
४. :——————————

९. स्पर्धकाची सही :——————————

माझ्या माहितीप्रमाणे वरील स्पर्धकाची माहिती बरोबर आहे.

**सांस्कृतिक विभागप्रमुख** **प्राचार्यांची सही व शिक्का**

==================================================

कार्यालयीन कामाकरिता

कार्यालयीन व्यवस्थापन समिती

१. वरील माहिती तपासली.

२. स्पर्धेत भाग घेण्यास योग्य/अयोग्य

३. अयोग्य असेल तर कारण : ————————————————

सदस्य, सल्लागार समिती संचालक, विद्यार्थी विकास विभाग

| प्रशिक्षक / वादक / साथीदार छायाचित्र |
|---|

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
# 'ज्ञानतीर्थ', विष्णुपूरी, नांदेड — ४३१ ६०६

## युवक महोत्सवात सहभागी प्रशिक्षक/वादक/साथीदार योग्यता प्रमाणपत्र

१. महाविद्यालयाचे नाव :———————————————
:———————————————

२. प्रशिक्षक /वादक/साथीदार पूर्ण नाव :———————————————

३. कायमचा पत्ता :———————————————
:———————————————

भ्रमणध्वनी क्रमांक :————————

४. जन्म दिनांक :———————————————

५. रक्त गट :———————————————

६. मार्गदर्शन करत असलेल्या
किंवा साथीदार/वादक
म्हणून भाग घेत असलेल्या स्पर्धेचे नाव :

१. :———————
२. :———————
३. :———————
४. :———————

७. प्रशिक्षक /वादक/साथीदार सही :———————————————

माझ्या माहितीप्रमाणे वरील माहिती बरोबर आहे.

सांस्कृतिक विभागप्रमुख प्राचार्यांची सही व शिक्का

====================================================

कार्यालयीन कामाकरिता

कार्यालयीन व्यवस्थापन समिती

१. वरील माहिती तपासली.

२. स्पर्धेत भाग घेण्यास योग्य/अयोग्य

३. अयोग्य असेल तर कारण : ———————————————

सदस्य, सल्लागार समिती संचालक, विद्यार्थी विकास विभाग

दि.

# हमीपत्र

हमीपत्र सादर करण्यात येते की, आमच्या महाविद्यालयाचा संघ स्वा. रा. ती. म. विद्यापीठाच्या आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात सहभागी होत आहे. सदरील संघातील संघव्यवस्थापक/संघव्यवस्थापिका, स्पर्धक विद्यार्थी/विद्यार्थिंनी कलावंत, वादक, वादक साथीदार, प्रशिक्षक यांच्याकडून आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवाच्या नियमावलीचे उल्लंघन होणार नाही, असे हमीपत्र सादर करण्यात येत आहे. तथापि आमच्या महाविद्यालयीन संघातील सहभागीकडून आंतर महाविद्यालयीन युवक महोत्सवाच्या नियमावलीचे उल्लंघन झाल्याचे आढळून आल्यास विद्यापीठाकडून नियमानुसार होणाऱ्या कारवाईस माझी हरकत असणार नाही.

धन्यवाद!

प्राचार्य

सही व शिक्का

(सदरील हमीपत्र हे महाविद्यालयाच्या शीर्षपत्रावर (Letter Head) देण्यात यावे.)

# प्रमाणपत्र

आमच्या महाविद्यालयाचा संघ आंतरमहाविद्यालयीन युवक महोत्सवात सहभागी होत आहे. संघाकडून सादर केल्या जाणा—या एकांकिका/प्रबोधनात्मक जलसे मी प्रत्यक्ष पाहिले आहेत. तसेच ह्या कलाप्रकाराची संहिता वाचली आहे.सदरील एकांकिका/प्रबोधनात्मक जलशामध्ये कोणत्याही प्रकाराचा आक्षेपार्ह मजकूर नाही. करिता हे प्रमाणपत्र देण्यात येते.

प्राचार्य

महाविद्यालयाचे नाव : ----------------------------------------------------------------------------------------------------------------

स्पर्धक सहभाग तक्ता / भाग घेतलेल्या स्पर्धकांच्या नावापुढे ✓ अशी खूण करावी

| अ.क्र. | स्पर्धकाचे नाव | वर्ग | जन्म दिनांक | शास्त्रीय गायन | शास्त्रीय तालवाद्य | शास्त्रीय सुरवाद्य | सुगम गायन - भारतीय | सुगम गायन - पाश्चात्य | समूह गायन - भारतीय | समूह गायन - पाश्चात्य | कव्वाली | फोक ऑर्केस्ट्रा (लोक संगीत) | लोकनृत्य / आदिवासी नृत्य | शास्त्रीय नृत्य | एकांकिका | विडंबन अभिनय | मूक अभिनय | नक्कल | वादविवाद | वक्तृत्व | कथाकथन | चित्रकला | कोलाज | पोस्टर पेंटिंग | मृद्मूर्तिकला | मेंहदी | व्यंगचित्रकला | रांगोळी | स्थळ छायाचित्रण | कलात्मक जुळवणी (इंस्टॉलेशन) | पोवाडा | लावणी | जलसा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ७ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ८ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ९ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| १० | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| ११ | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

सांस्कृतिक विभाग समन्वयक

प्राचार्यांची सही व शिक्का